पोलीस आयुक्त , छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय,
मिलकॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००१.
दुरध्वनी क्रमांक ०२४०-२२४०५९१,फॅक्स क्र.०२४०-२२४०५९६
ई मेल :- ps.splbranch.abad@mahapolice.gov.in

गोपनिय जा.क्र.विशा-३/आदेश/छ. संभाजीनगर /२०२४ -1066 छ. संभाजीनगर दिनांक.03/ ०३ /२०२४

## फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) व (३) अन्वये आदेश.

आदेश :-

ज्या अर्थी माझ्या असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, दि. ०५/०३/२०२४ रोजी VVIP यांचा छत्रपती संभाजीनगर येथे दौरा आहे. VVIP यांच्या सुरक्षितेच्या दुष्टीकोणातुन दि. ०४/०३/२०२४ व दि. ०५/०३/२०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय हद्दीत ( NO DRONE ZONE ) प्रतिबंधक आदेश देणे आवश्यक वाटते सदर प्रतिबंधक आदेश सर्व संबधितांना वैयक्तिक रित्या बजावणे शक्य नसल्याने व त्यांना अवगत करणे आवश्यक असल्याने फौजदारी प्रक्रिया संहीता सन १९७३ कलम १४४(१) व (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारचा वापर करुन छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय हद्दीत दि. ०४/०३/२०२४ व दि. ०५/०३/२०२४ रोजी ( NO DRONE ZONE ) प्रतिबंधक आदेश काढणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी मनोज लोहीया पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर मला फौजदारी प्रक्रिया संहीता सन १९७३ कलम १४४(१) व (३) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारचा वापर करुन छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय हद्दीत दि. ०४/०३/२०२४ व दि. ०५/०३/२०२४ रोजी ( NO DRONE ZONE ) प्रतिबंधक आदेश संबधीतांना या द्वारे आदेशीत करुन काटेकोर पणे पालन करण्यासाठी लेखी आदेश काढत आहे.

या आदेशाचे उल्लघंन करणा-यावर भारतीय दंड विधान संहितेचे कलम १८८ अन्वये व प्रचलित कायद्यानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व तो शिक्षेस पात्र राहील.

**सदरील आदेश दिनांक ०४/०३/२०२४ पासुन दिनांक ०५/०३/२०२४ पावेतो अंमलात राहील.**

सर्व पोलीस उप आयुक्त, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी, यांना सुचित करण्यात येते की, सदरचा प्रतिबंधक आदेश सर्व संबंधितांना वैयक्तिक रित्या बजावणे शक्य नसल्याने व त्यांना अवगत करणे आवश्यक असल्याने आपण सदर प्रतिबंधात्मक आदेशास प्रसिध्दी माध्यमे, सर्व पोलीस ठाणे, पोलीस अधिकारी कार्यालय, छावणी मंडळ, महानगर पालिका, मध्यवर्ती

बसस्थानक, रेल्वेस्टेशन, मुख्य बाजारपेठा, सार्वजनिक वाचनालये इत्यादी महत्वाच्या ठिकाणच्या सुचना फलकावर चिटकावुन प्रसिध्दी द्यावी. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे प्रसिध्दीची कार्यवाही करावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही आमचे अधिनस्थ परिमंडळाचे सर्व पोलीस उप-आयुक्त, विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना प्राधिकृत करीत आहोत.

सदर आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज दिनांक. ०३/०३/२०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे जारी करण्यात आला आहे.

03.03.2024

**( मनोज लोहिया )**
पोलीस आयुक्त,छत्रपती संभाजीनगर

प्रति :-

१)सर्व पोलीस उप-आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
२)सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
३)सर्व पो.स्टे./शाखा प्रभारी अधिकारी,नियंत्रण कक्ष,छत्रपती संभाजीनगर

प्रतिलिपी :-

१)विभागीय आयुक्त,छत्रपती संभाजीनगर
२)जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर
३)म.न.पा.आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
४)उपायुक्त,राज्य गुप्तवार्ता विभाग, छत्रपती संभाजीनगर
५)जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
६)केंद्र संचालक,आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर
७)सोशल मिडीया,गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर
८)शासकीय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर
९) भारतीय विमानपतन प्राधिकरण , छत्रपती संभाजीनगर